# राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९e९ /२०२५ दि२९/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **राबोडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. के. व्हिला ते अक्सा मेडिकल, आकाशगंगा राबोडी रोड अरूंद आहे. **दि. ३१/०८/२०२५ (पाच दिवस), दि.०२/०९/२०२५ रोजी (गौरी गणपती व सात दिवस), दि.०६/०९/२०२५ रोजी ( अनंत चतुर्दशी ) तसेच दि.०५/०९/२०२५ रोजी ईद ए मिलाद** सण साजरा होणार आहे. सदरवेळी परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** के. व्हीला नाका – अक्सा मेडिकल मार्गे नूर मस्जीद रोडने आकाशगंगा राबोडीच्या दिशेने जाणाऱ्या तीन चाकी व त्यावरील सर्व प्रकारच्या वाहनांना **के. व्हीला** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने के. व्हीला नाका येथून सरळ मॉ. मिनाताई ठाकरे चौक रोडने जुने राबोडी पोलीस स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दि. ३१/०८/२०२५ (पाच दिवस), दि.०२/०९/२०२५ रोजी (गौरी गणपती व सात दिवस), दि.०६/०९/२०२५ रोजी ( अनंत चतुर्दशी ) तसेच दि.०५/०९/२०२५ रोजी ईद ए मिलाद या दिवशी** दुपारी १४.०० वा. ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो गणपती विसर्जन संपेपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मुंबई व वसई–विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी
**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे त्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.